# कोविड १९ चा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम आणि स्थानिक स्वराज्य संस्था

**प्रा.डॉ.टी.एम.पाटील , राज्यशास्त्र विभागप्रमुख, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड**

---

**प्रस्तावना :**

आजच्या परिस्थितीचा विचार करता कोरोना विषाणमुळे मागील महायुध्दापेक्षाही गंभीर परिस्थिती जगामध्ये निर्माण झाली आहे. झालेल्या महामहारीमुळे संपूर्ण जग भयभीत झाले आहे. सर्वशक्तिमान व विकसित समजल्या जाणाऱ्या अमेरिका आणि युरोपीय देशांनी या महामारीसमोर हात टेकले आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेचे महायुध्दामुळे जेवढे नुकसान झाले नाही त्यापेक्षा अधिक नुकसान या महामारीमुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोरोनामुळे संपूर्ण जग महामंदीत लोटले जात आहे. जागतिक बॅंक आणि जगातल्या इतर संस्थांच्या अहवालाद्वाहरे अस दिसून येतय की भविष्यामध्ये संपूर्ण जगाला काही अडचणींना सामोरे जावं लागणार. सद्यस्थितीत सरकारची प्राथमिकता आपल्या नागरीकांना महामारीपासून सुरक्षित ठेवून त्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हीच आहे. देशाच्या ग्रामीण भागातील जनतेसाठी रोजगार उपलब्ध व्हावा याकरिता भारत सरकारच्या अनेक योजना आहेत. मनरेगा म्हणजेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही त्यापैकी एक महत्वाची योजना आहे. आताच्या परिस्थितीत कोंद्र सरकारला आणि राज्य सरकारांना ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढण्यासाठी खास लक्ष द्यावे लागेल. यातून ग्रामीण भागातील लोकांचा रोजगाराचा काही अंगी प्रश्न सुटण्यास मदत होईल. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार करावयाचा झाल्यास ज्या भागात दुध व्यवसाय चांगला आहे त्या भागात लोकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला नाही तसेच उस पट्टयातील लोकांचा ही रोजगार कोविड १९ च्या काळात चालू होता त्या भागात याचा परिणाम काही अंशी कमी प्रमाणात जाणवला पण ज्या भागात हातातोंडाशी आलेले रब्बी पीक सध्या शेतात उभे आहे.

अशा भागात मात्र कोविड १९ चा आणि लॉकडॉऊनचा परिणाम त्या भागावर मोठया प्रमाणात झाळेळला आपल्याला पहावयास मिळतो या अनुषंगाने ग्रामीण भागात कोविड १९ आणि लॉकडाऊनचा अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम या विषय या शोध निबंधात विचार मंथन करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) महाग्रामीण अर्थव्यवस्था अभ्यासणे.

२) कोविड १९९ चा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम अभ्यासणे.

३) कोविड १९१९ चा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम आणि स्थानिक स्वराज्य
संस्थांची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :**

सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला असून यातील स्पष्टीकरणासाठी इंटरनेट, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, उपयुक्त मासिकांच्या योग्य प्रमाणात उपयोग करण्यात आला.

**आशय विश्लेषण :**

कोविड १९ चा परिणाम प्रामुख्याने डिसेंबर २०१९ पासून चीन देशात आपल्याला पहावयास मिळाला आणि त्याचे आगमन भारतात फेब्रुवारी मध्ये झाले आणि भारत सरकारने २३ मार्च २०२० ला लॉकडाऊनला सुरूवात केली म्हणजे मार्च २०२० पासून ते जवळजवळ जुले २०२१ पर्यंत कोविडचा परिणाम ग्रामीण जीवनावर झालेला आपल्याला पहावयास मिळत आहे पहिल्या टप्प्यातील निर्बंध शिथील होताच तोच दुसरी लाट आली आणि त्या लाटांचे निर्बंध अजून सुध्दा आपल्याला पहावयास मिळतात. या दोन्ही लाटेचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला आपल्याला पहावयास मिळत आहे.

**अ) महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्था अभ्यासणे :**

महाराष्ट्र हे देशात पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रात ६० टक्के पेक्षाही अधिक लोक ग्रामीण भागात राहतात. प्रशासनाच्या सोयीसाठी राज्याचे भौगोलिक तत्वावर ६ विभाग पाडले आहेत. महाराष्ट्रातीलग्रामीणअर्थव्यवस्था ही उधार उसनवारवर व्यवहार करणे आणि पिकांची काढणी झाल्यानंतर उधार उसनवार फेडणे तसेच काही भागात बारा बलुतेदार पध्दती आहेत. कामाच्या बदल्यात धान्य देण्याची व्यवस्था आहे आणि काही

भागात सहकारी संस्थांच्या माध्यमातून पैशाची व्यवस्था उभारणे एकंदरीत महाराष्ट्रात विभागानुसार ग्रामीण अर्थव्यवस्था निर्माण झालेली पहावयास मिळते. उदाहरणार्थ, पश्चिम महाराष्ट्रात सहकारी संस्था मोठया प्रमाणात आहे पण विदर्भ आणि मराठवाडयाचा विचार केला तर सावकारकी पध्दत अजून पहावयास मिळते. महाराष्ट्राच्या ज्या भागात दुध उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जाते त्या भागाची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे सहकारावर आधारलेली पहावयास मिळते म्हणजे सहकाराच्या आधारावर दुध संस्था उभारणे शेतकरी दुध संस्थेमध्ये दुध संकलन करून दुध संघाच्या माध्यमातून त्यांना दहा दिवसाला त्या दुधाचे पैसे दिले जातात. अशा प्रकारे त्या ठिकाणची अर्थव्यवस्था चालत असते.

महाराष्ट्राच्या ज्या भागात ऊस उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जाते त्या भागाची अर्थव्यवस्था ही सहकारी साखर कारखाना यावर अवलंबून असते. त्या भागात सुध्दा पैशाची व्यवस्था ही कारखान्यामार्फत केली जाते. प्रामुख्याने दुध आणि ऊस पट्टयात ग्रामीण अर्थव्यवस्था ही सक्षम असलेली पहायवास मिळते.

ज्या ग्रामीण भागात रब्बी पिके घेतली जातात त्या भागात मात्र व्यापाऱ्यांच्या धोरणावर अर्थव्यवस्था असलेली पहावयास मिळते. पिकांची कोणतीही किंमत ठरवण्याचा अधिकार तिथल्या शेतकऱ्यांना नसतो. तसेच भाजीपाला ज्या भागात मोठया प्रमाणात उत्पन्न म्हणून घेतले जाते त्या भागातील अर्थव्यवस्था पण अस्थिर असलेली असलेली पहावयास मिळते. म्हणजेच रब्बी पिके फळे, भाजीपाला आणि फुले यांचे उत्पादन ज्या भागात घेतले जाते. त्या भागातील अर्थव्यवस्थेवर व्यापारी, बाजारपेठेवर सावकार यांचा प्रभाव पहायवास मिळतो.

कोकण विभागातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार करावयाचा झाल्यास तिथली मासेमारी आणि आंबा शेती यावरती तिथली अर्थकारण अवलंबून आहे. प्रामुख्याने कोकणातील ग्रामीण व्यवस्था ही मासेमारी आणि आंब्याच्या विक्रीतून आपला उदरनिर्वाह करताना पहावयास मिळते त्या बरोबर भात
शेतीची भुमिका यामध्ये महत्वाची आहे. अशा पध्दतीने महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्था विचार करता येईल.

**ब) कोविड १९ चा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम :**

कोविड १९ चा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दुरगामी परिणाम झालेला पहायवास मिळतो. महाराष्ट्राच्या सहा प्रशासकीय विभागावर याचा कमी अधिक प्रमाणात परिणाम झालेला आहे. अनेकांच्या रोजगारावर त्यामुळे गदा आली आहे. ग्रामीण भागात ज्यांचे पोट हातावर आहे. अशा लोकांच्या हाल अपेष्टांना तर पारावर उरलेला नाही. महाराष्ट्रातील सर्वाधिक रोजगार शेतीक्षेत्राशी निगडीत आहे. ५० लाखांहून अधिक मच्छिमारांचा उदरनिर्वाह थेट मासेमारीवर अवलंबून आहे. त्यातील ८० टक्के मच्छिमारांचे उत्पन्न जेमतेम आहे. मच्छिमारी क्षेत्र किमान ६० ते ८० लाख लोकांना रोजगार पुरवते. हा सर्व व्यवहार ठप्प आहे.

१. महाराष्ट्रात टाळेबंदी लागू केल्यामुळे हातातोंडाशी आलेले रब्बी पिक सध्या शेतात तसेच उभे आहेत. शेतातील पीक काढणीला आलेले आहे परंतु त्यासाठी मजूर मिळेनासे झाले आहे. मालवाहतूक ठप्प झाली आहे त्यांच्या मालाला उठाव नाही हाती असलेला माल त्यांना कवडीमोल भावाने विकावा लागत आहे त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

२. कोथिंबीर कॉफी केळी इ. पिकांच्या लागवडीचा हा हंगाम मात्र तोही वाया गेला आहे. शेतीकामासाठी शेतमजकूर मिळेनासे झाले आहे.

३. फळे, भाजीपाला आणि फुले यासारख्या नाशवंत पिकांचे तर उत्पादक तोटयात गेले आहेत. त्यांच्या मालाला उठाव नाही. त्यांच्या मालाला उत्पादन खर्चापेक्षाही कमी किंमतीचा भाव मिळत आहे. मार्च, एप्रिल, मे हा हंगाम तर फुलशेतीसाठी सुगीचा हंगाम मानला जातो. मात्र प्राप्त परिस्थितीत त्यांनाही नुकसान सहन करावे लागत आहे. कोरोना विरहीत परिस्थिती असती तर याच शेतकऱ्याचा याच शेतीतून लाखोंचा फायदा झाला असता.

४. पोल्ट्री शोतकरी, लहान दुधउत्पादक शेतकरी यांना ही मोठया नुकसानाला सामोरे जावे लागत आहे कारण अनक खाजगी कंत्राटदारांना त्यांचा माल घेण्यासच नकार दिला होता.

५. मार्च अखेरपासून मच्छिमारांनी मासे मारीसाठी समुद्रातबोट ढकलळलेलीच नाही. आणि आता माशांचा प्रजननाचा काळ म्हणून दरवर्षी जाहीर होणार ४५ दिवसांचा ना मासेमारी हंगाम ही तोंडावर येऊन ठेवला आहे त्यामुळे मच्छिमारासमोर रोजगारांचा प्रश्न आ वासून उभा आहे. तसेच युरोप आणि अमेरिकेत निर्यात होणारा शिंपल्यांचा व्यापार ठप्प झाला आहे त्यामुळे मच्छिमारांना न भूतो, न भविष्यती अशा परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.

६. टाळेबंदीची सर्वाधिक झळ आदिवासी जनतेला पोहोचली आहे कारण वन उत्पादनाबरोबरच तेंदू पाने गोळा करणे आणि मोहाची फुले गोळा करणे हे दोन मुख्य व्यवसाय आदिवासी लोक करतात त्यातून त्यांना बऱ्यापैकी उत्पन्न मिळते परंतु त्यांच्याकडून मोहाची फुले आणि तेंदूची पाने घेण्यासाठी कोणताही एजंट येईनासा झाला आहे आणि स्थानिक बाजारपेठाही बंद आहेत त्यामुळे आदिवासींना सर्वाधिक फटका सहन करावा लागत आहे.

७. महाराष्ट्रातील ऊस उत्पादन घेणाय्रा जिल्हयांच्यावरही टाळेबंदीचा परिणाम झालेला पहायवास मिळतो या क्षेत्रा काम करण्यासाठी येणाऱ्या ऊसतोडणी कामगारांची कमतरता भासते. त्यामुळे उस उत्पादक शेतकऱ्यांच्या समोर आपल्या शेतातील ऊस साखर कारखान्यापर्यंत कसा पोचवायचा हा प्रश्न निर्माण झाला होता. यातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्त पैसे खर्च करून आपला ऊस कारखान्यापर्यंत पोचवावा लागला, साखरेला उठाव नसल्या कारणाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऊसाचे पैसे वेळेवर मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. अशा प्रकारे टाळेबंदीचा परिणाम ऊस, दुध मासेमारी, फळे, फुले, भाजीपाला, पेल्ट्री, मासेमारी या सर्व ग्रामीण अर्थशास्त्र चालवणाऱ्या पिकावरती झालेली पहावयास मिळतो आहे. यातून मिळणाऱ्या उत्पान्नावरच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे वार्षिक नियोजन चालत असते. हे सर्व नियोजन टाळेबंदीमुळे कोलमडल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे आणि त्याच बरोबर घेतलेल्या कर्जाचे मोठे हप्ते ही आहेत अशा कात्रीत महाराष्ट्रातील शेतकरी सापडला आहे.

**क) ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची भूमिका :**

कोविड १९ चा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर न भूतो, न भविष्यती असा झाला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था ज्या व्यवसायावर उभी असते तेच व्यवसाय खुप तोटयात चालले आहेत किंबहुना गेले आहे. या सर्व परिस्थितीमध्ये कोंद्र शासनाकडून आणि महाराष्ट्र शासनाकडून मिळणारी मदत असो किंवा सूचना असोत तसेच आरोग्यांच्या बाबत काही मार्गदर्शक तत्वे असोत यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातूनच होत असते. त्यामुळे या सर्व परिस्थितीमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांची भूमिका महत्वाची आहे.

१. जिल्हापरिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून कोविड १९ च्या कामात जी कामे झाली नि ग्रामीण आर्थिक स्तर, त्याचबरोबर लोकांच्या रोजगार उंचावला निर्मिती करण्यास ही महत्वपूर्ण भूमिका या पंचायत राज्य संस्थांनी निभावलेली आहे. उदा. मनरेगा म्हणजेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनेची अंमलबजावणी ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायत मार्फत योग्य पध्दतीत राबवली जात आहे.

२. कोंद्र सरकार आणि राज्यशासन यांनी शेतीमाल तसेच माशांच्या व्यापारावरील निर्बंध काही प्रमाणात उठवले मात्र प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती, ताळमेळाअभावी शेतकऱ्यापर्यंत या सवलती पोहोचलेल्या नाहीत. या सवलती पोहोचविण्याचे काम स्थानिक स्वराज्य संस्था करीत आहेत.

३. शेतीविषयक कार्यक्रमांचे आयोजन. पिकांच्या लागवडीविषयी सल्ला, शेतमालाच्या विक्रीसाठी मागदर्शन हे कार्यक्रम ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायत मार्फत राबविण्यात येत आहेत.

४. कोरोनाविषयी जाणीव जागृती करून त्यापासून वाचण्यासाठी काय उपाय करायला हवेत याविषयीही अनेक गावात ग्राम पंचायत मार्फत मार्गदर्शन केले जात आहे.

५. केंद्रीय आरोग्य आणि कुठूंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदशक सूचना नुसार वेळोवेळी गावातील सर्व कुटूंबाची, आशासेविका आणि अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने तपासणी करून ताप, सर्दी, खोकला आणि थकवा अशी लक्षणे असलेल्या व्यक्तीची अँटिजन टेस्ट करून त्यांना सक्तीने विलगीकरणात ठेवण्याची व्यवस्था ग्रामपंचायती मार्फत करण्यात येत होती.

६ . ग्रामीण स्तरावरील दक्षता समितीच्या मार्फत गावातील सर्व वितरण व्यवस्था केली जाते यामध्ये कोविड १९ च्या काळात लोकांना मोफत धान्य मिळाले याची वितरण व्यवस्था ग्रामीण भागात दक्षता समिती योग्य प्रकारे करण्यात आली.

७. संस्थात्मक अलगीकरण आणि अलगीकरण असलेल्या लोकांच्या भोजनापासून ते अन्य गरजांची व्यवस्था करण्याचे काम कोरोना कृती दलाच्या आणि गावातील सामाजिक संस्था, तरूण मंडळ, महिला बचत गट, दानशूर व्यक्तींच्या सहाय्याने पूर्वी करण्याचे काम ग्रामपातळीवर झालेले आहे.

८. कोविड १९ च्या काळात सर्वाचे लक्ष मानवाची सुरक्षितता आणि आरोग्य याकडे होते तेव्हा ग्रामीण स्तरावर मात गावातील लोकांच्या आरोग्याची काळजी कोरोना दक्षता समिती घेत होतीच पण या सर्व परिस्थितीमध्ये ग्रामपंचायत मार्फत जनावरांचा आणि गावातील पशु पक्षी यांच्या आरोग्यासाठी सार्वजनिक लसीकरण कार्यक्रम राबवले जात होते म्हणजे ग्रामस्तरावर ग्रामपंचायत सर्वागिण कार्यक्रमांचे नियोजन करत आहे.

९. कोरोना काळात ग्रामपंचायतमध्ये कोरोना नियंत्रण व स्वच्छता समिती स्थापन करून या समितीमार्फत कोरोना विषाणू नियंत्रण व गावातील स्वच्छतेचा आढावा घेण्यात येत आहे.

१०. ग्रामपंचायती मार्फत कोरोनाच्या कालावधीमध्ये गावात लग्न समारंभ, सप्ताह, यात्रा व इतर सामाजिक कार्यक्रम घेवू नये या करीता समुपदेशन करणे.

११. ग्रामपंचायतीच्या मार्फत कोविडच्या काळात गावातील प्राथमिक शाळा चालू करत असताना त्या शाळा सॅनियटाईझ करून घेणे. शाळेतील मुलांच्या पोषण आहार मुलांच्या घरी पोहोच करणे,

तसेच शाळा परिसर स्वच्छ करून प्राथमिक शाळा चालू करण्याबाबत शालेय समिती बरोबर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१२. कोविड १९ चा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला असताना याहून आर्थिक परिस्थिती सुधरण्याकरिता ग्रामपंचायतीमा्फत महिला सक्षमीकरणासाठी महिलांच्या बचत गटांची उभारणी करण्यात येत आहे.

अशाप्रकारे कोविड १९ च्या अधिक परिणाम सध्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झाला असला तरी पंचायत राज्य च्या अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, आणि पंचायत समितीच्या माध्यमातून ही परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न ग्रामपंचायत मार्फत होत आहेत.

**निष्कर्ष :**

कोरोना महामारीचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम आणि यातून निर्माण झालेले प्रश्न या सर्वातून ग्रामीण अर्थव्यवस्था डबघाईला आली. या परिस्थितीतून ग्रामीण भागात महत्वाची भूमिका ग्रामपंचायतीने निभावलेली आहे, केंद्र सरकार आणि राज्यशासन यांच्या सर्व सूचनांचा अंमलबजावणी करण्याचे काम ग्रामपंचायतीने केळे आहे आरोग्य शेती, शिक्षण, रोजगार या सर्व बाबत ग्रामपंचायतीने जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि राज्यशासन यांच्या सल्यानुसार अतिशय महत्वपूर्ण काम केले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक कामे काढन अधिकाधिक लोकांना रोजगार मिळेल, शेत मजूरांना शेतात काम करण्यास प्रोत्साहित करणे इ. उपाययोजना करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देण्याचे काम केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांनी सुध्दा केलेले आहे.

**संदर्भ :**

१. प्रा. बी. बी. पाटील, "महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण", फडके प्रकाशन, कोल्हापूर

२.प्रा. बी.बी. पाटील, " महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था", फडके प्रकाशन, कोल्हापूर

३. आर. व्ही. भवानी, "कोरोनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पंचायत", २५ एप्रिल २०२० चा
इंटरनेट वरील लेख.

४. पाटील पी.बी., "पंचायत राज्याकडून ग्राम स्वराज्याकडे", समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी

५.डॉ. वा. भा. पाटील, " पंचायती राज्य", विद्या प्रकाशन, नागपूर, जिल्हा परिषद, कोल्हापूर
१९ मार्च २०२० चा आदेश (जी आर)

६. जिल्हापरिषद कोल्हापूर, २९ मार्च २०२० चा जी आर